**शासकीय जाहिरात वितरण धोरणात सुधारणा करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: मावज–२०१६/प्र.क्र.५६/३४**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई–४०० ०३२

तारीख: ३० मार्च,२०१६

**वाचावे–**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.पीयुबी–१०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दिनांक १ मे, २००१

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज–२०१५/प्र.क्र.३२७/३४. दिनांक ६ ऑक्टोबर,२०१५

**प्रस्तावना–**

संदर्भाधिन शासन निर्णय क्र. २ अन्वये ''स्थानिक स्वराज्य संस्था वगळून शासनाची सर्व महामंडळे/मंडळे,प्राधिकरणे, आयोग व राज्य शासकीय कंपन्या यांच्या वर्गीकृत व दर्शनी जाहिराती, या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फतच वितरीत करण्यात याव्यात.'' असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. महामंडळाकडील जाहिरातींचा व्याप व तातडी लक्षात घेऊन अटींमध्ये सूट देण्याची विनंती शासनास करण्यात आली होती. त्याचा विचार करुन, शासन निर्णयात सूधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सदर शासन निर्णयात सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**शासन निर्णय :–**

शासनाची सर्व महामंडळे/मंडळे, प्राधिकरणे, आयोग व राज्य शासकीय कंपन्या यांच्या मार्फत देण्यात येणाऱ्या जाहिराती अतिशय कालबद्ध व पूर्व नियोजनाद्वारे होण्यासाठी, वर्गीकृत जाहिराती (Classified Advertisement), त्यांच्या स्तरावरुनच वितरीत करण्यात याव्यात. परंतु त्यांनी सर्व जाहिराती शासनमान्य दराने वितरीत कराव्यात. शासनाची सर्व महामंडळे/मंडळे, प्राधिकरणे, आयोग व राज्य शासकीय कंपन्या यांच्या दर्शनी जाहिराती (Display Advertisement) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फतच वितरीत करण्यात याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३३०११२२५३६४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MUSALE RAMKISAN NARAYANRAO

Digitally signed by MUSALE RAMKISAN NARAYANRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GOVT. OF MAHARASHTRA,CID - 916891, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=eb28cc64e4adc3dd948671d0896f641e3e54c25e6de133a784d0a3d037ae7ff8, cn=MUSALE RAMKISAN NARAYANRAO
Date: 2016.03.30 11:27:26 +05'30'

**(रा.ना.मुसळे)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. राज्यपालांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री/यांचे खाजगी सचिव
४. मुख्य सचिव/ अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव
५. सर्व मंत्रालयीन विभाग
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
९. सर्व मंडळे/महामंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था/शासनाच्या स्वायत्त संस्था
१०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई.
११.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१२.प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१३.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ , (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१४.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ , (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
१५.अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१६.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
१७.संचालक (माहिती), नागपूर-अमरावती
१८. संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली
१९.उप संचालक (माहिती), नाशिक,पुणे, औरंगाबाद, अमरावती, कोकण, कोल्हापूर विभाग
२०.सर्व जिल्हा माहिती अधिकारी
२१.सर्व उपमाहिती कार्यालये,
२२.निवडनस्ती

- पत्राने